यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प शिक्षण/प्राथ/खाप्राशा/४४४/२०१७
पुणे-दिनांक -१७ /०३/२०१७

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
जॉन विल्सन एज्युकेशन सोसायटी संचलित सेंट ॲन्ड्रयूज हायस्कुल फॉर गर्ल्स पुणे. जि.पुणे.

**विषय - बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ याचा पोट नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणे बाबत.**

आपला अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळांनी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद , पुणे दिनांक १ एप्रिल २०१६ पासुन दिनांक ३१ मार्च २०१९ पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता ५ वी ते ८ वी च्या वर्गाकरिता **जॉन विल्सन एज्युकेशन सोसायटी संचलित सेंट ॲन्ड्रयूज हायस्कुल फॉर गर्ल्स पुणे. जि.पुणे.** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन ) शाळा पालन करील.

३. शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहील्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ठ केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल. अशी प्रतिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५. संस्था / शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या माता -पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पूराव्याच्या अभावी, धर्म,जात किंवा वंश , जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने/ शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत ला गुंतवुन घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करेल.